| | |
|---|---|
| MHBI100008222019 | किरकोळ फौजदारी अर्ज क्र. २०६/२०१९<br>अश्वीनी मुकटे वि. अशोक मुकटे |

## निशाणी ०१ खाली आदेश

सदरचे प्रकरण हे कलम १२८ सि.आर.पी.सी. नुसार दाखल केले आहे. अर्जदार हे गैरअर्जदाराची हे राहणार जामगाव आ. ता.बार्शी जि.सोलापूर येथील असुन अर्जदार सध्या समर्थ नगर, केज ता. केज येथे राहत आहेत. सदरचे प्रकरण हे २०१९ या वर्षाचे असुन अंदाजे ०६ वर्षाधिक जुने आहे. न्यायालयीन अभिलेखाचे अवलोकन केले असता सदर प्रकरण अर्जदाराच्या दखल करणेकामी प्रलंबीत आहे. रोजनाम्याचे अवलोकन केले असता अर्जदार व त्यांचे विधिज्ञ दिनांक २७.०९.२०२३ पासुन ते आज रोजी पर्यंत गैरहजर असल्याचे दिसुन येत आहे. दिनांक ३०.०१.२०२४ रोजी सदरचे प्रकरण हे खारीज करण्याकरता ठेवले होते. त्यानंतर आज रोजीपर्यंत अर्जदार न्यायालयात दखल घेण्या करीता हजर नाही. अर्जदार व त्यांच्या विधिज्ञांचा वारंवार पुकारा केला असता गैरहजर. आज अर्जदारातर्फे वेळ मिळण्याकरीता विनंती अर्ज दिला नाही. त्यामुळे वरील बाबींचा व परिस्थितींचा विचार करता अर्जदाराला प्रस्तुत प्रकरणात स्वारस्य नसल्याचे दिसून येते. करिता सदरचे प्रकरण हे खारीज आदेश करण्यास योग्य राहिल.

## आदेश

१. अर्जदाराने तजविज न ठेवल्यामुळे प्रस्तुतचा खटला निकाली काढण्यात येतो.

२. अर्जातील सर्व अंतरिम आदेश रद्दबातल करण्यात येतात.

Digitally signed by SURESH SUBHASH BADGUJAR
Date: 2026.03.12 17:29:23 +0530

DISTRICT COURTS MAHARASHTRA
सत्यमेव जयते

दि. १२.०३.२०२६

(एस.एस.बडगुजर)
प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, केज

CERTIFICATE

I affirm that the contents of this PDF file are word to word as per original judgment/ order.

| | | |
|---|---|---|
| Dictated on | : | 12.03.2026 |
| Transcribed on | : --- | |
| Checked & signed on | : | 12.03.2026 |

Sd/-
( M.R.Dhanwade ),
Junior Clerk
Ct. of CJJD and JMFC, Kaij.